# पुणे विद्यापीठ


दूरध्वनी क्र.०२०–२५६०१२०४
इंजि.– २५६०१२११
मॅनेज/लॉ/शि.शा. .–२५६०१२१६
आर्टस.– २५६०१२१३
सायन्स.– २५६०१२१४/कॉमर्स–२५६०१२१५
फार्मसी/मेडिकल–२५६०१२२०

परीक्षा विभाग
टेलिग्राफ : "युनिपुणे"
फॅक्स –०२०–२५६०१२०८
फॅक्स –०२०–२५६०१२०४

वेबसाईट:www.unipune.ac.in
ई.मेल coe@unipune.ernet.in


---

संदर्भ: परीक्षा/बी.एस्सी./01 दि. ६.१.२०१२

मा. प्राचार्य,
सर्व संलग्न बी.एस्सी..महाविद्यालये.

विषय : एस.वाय./टी.वाय.बी.एस्सी. ऑक्टोबर, २०११ परीक्षेच्या निकालाबाबत...

महोदय/महोदया,

एस.वाय./टी.वाय.बी.एस्सी. ऑक्टोबर २०११ मध्ये घेतलेल्या परीक्षेचा निकाल मंगळवार दि.१०.१.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता जाहीर करण्यात येत आहे. परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे महाविद्यालयात वितरीत करण्यात येईल.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल मंगळवार दि.१०.१.२०१२ रोजी १२.०० ते ३.०० या वेळेत परीक्षा विभागातून घेऊन जावयाचा आहे.

२. अहमदनगर व नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून मंगळवार दि.१०.१.२०१२ रोजी दुपारी १२.०० ते ३.०० या वेळेत घेऊन जावयाचा आहे.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी.. त्यामुळे विद्यापीठामध्ये निकाल विचारण्यासाठी अथवा इतर चौकशी करण्यासाठी विद्यार्थ्यांना यावे लागणार नाही. त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात न पाठविता, महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. त्यानंतर त्यातील दुरुस्त्या त्वरीत करुन घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेऊन जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारीत तारखा खालीलप्रमाणे आहेत.
विना विलंब शुल्कसह - १८.१.२०१२
विलंब शुल्कासह - २७.१.२०१२

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :
१. विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक/अहमदनगर, यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना वेळेवर देण्याची व्यवस्था करावी.
२. मा. गृहव्यवस्थापक [गृहव्यवस्थापन विभाग] - प्रत्येक उपकेंद्रासाठी दि.१०.१.२०१२ रोजी सकाळी ७.०० वाजता दोन स्वतंत्र वाहने उपलब्ध करण्याची व्यवस्था करावी.

A1/b.sc.mararthi/९